www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-II
# MARATHI

Seat No. (In figures as in Admit Card)

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ................................................

2. (Signature) ..........................................

(Name) ................................................

Seat No. ..............................................................
(In words)

OMR Sheet No.
(To be filled by the Candidate)

## JAN - 01218

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **12** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide



Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



# Marathi
## Paper II
# मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **50** multiple choice questions, each carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **50** बहुपर्यायी प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'पोवाडा हे केवळ श्राव्य नव्हे; ते दृश्यकाव्यही आहे. पोवाडा हे एकप्रकारचे नाटक आहे. त्यात अनेक पात्रे असतात. मुख्यत शाहीर व त्याचा साथीदार हे दोघे पोवाड्यातील व्यक्तींच्या सोंगाची बतावणी करतात.' असे पोवाड्यासंबंधी विवेचन कोणी केले आहे ?

   (A) य. न. केळकर
   (B) शाळिग्राम
   (C) श्री. व्य. केतकर
   (D) वि. का. राजवाडे

2. 'वैखरी भाषा आणि भाषाव्यवहार' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

   (A) न. चिं. केळकर
   (B) अशोक केळकर
   (C) रमेश धोंगडे
   (D) य. न. केळकर

3. 'बळीबा पाटील' या कादंबरीचे लेखक कोण ?

   (A) बापूजी हरी शिंदे
   (B) कृष्णराव भालेकर
   (C) गणपतराव पाटील
   (D) तुकाराम तात्या पडवळ

4. चारुता सागर या टोपणनावाने लेखन करणाऱ्या लेखकाचे मूळ नांव सांगा.

   (A) मा. ना. पाटील
   (B) म. भा. भोसले
   (C) दिनकर दत्तात्रय भोसले
   (D) रामचंद्र बाबर

5. त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना 'बालकवी' ही उपाधी कोणी दिली ?

   (A) राम गणेश गडकरी
   (B) ना. वा. टिळक
   (C) का. र. कीर्तिकर
   (D) कवी चंद्रशेखर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



6. 'विकारविलसित' ही साहित्यकृती कोणत्या नाटकाचा अनुवाद आहे ?

(A) हॅम्लेट

(B) मॅक्बेथ

(C) ॲज यू लाइक इट

(D) टेम्पेस्ट

7. पुढील ग्रंथ आणि त्यांचे अनुवादक यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) गॉन विथ द विंड | (5) प्रलहाद वडेर |
| (2) द अल्केमिस्ट | (6) विजय पाडळकर |
| (3) पिएर अँड जॉन | (7) नितिन कोत्तापल्ले |
| (4) उमरावजान | (8) वर्षा गजेंद्रगडकर |
| | (9) अपर्णा वेलणकर |

(A) (1)–(6), (2)–(8), (3)–(7), (4)–(9)

(B) (1)–(9), (2)–(5), (3)–(8), (4)–(7)

(C) (1)–(7), (2)–(6), (3)–(9), (4)–(5)

(D) (1)–(8), (2)–(7), (3)–(5), (4)–(6)

8. मराठीतील कोणत्या प्रकाशनसंस्थेने अनुवाद हेच आपले प्रमुख कार्यक्षेत्र म्हणून अलीकडे निश्चित केले आहे ?

(A) पद्मगंधा प्रकाशन

(B) मौज

(C) मेहता पब्लिशिंग हाऊस

(D) प्रतिमा प्रकाशन

9. मंगेश पाडगावकर यांनी शेक्सपियरच्या कोणत्या नाटकांचे मूळाबरहुकूम अनुवाद केले आहेत ?

(A) द टेंपेस्ट, ज्युलियस सीझर आणि रोमिओ अँड जूलिएट

(B) हॅम्लेट, किंग लिअर आणि मॅकबेथ

(C) मिड्समर नाईट्स ड्रीम, ऑथेल्लो आणि द टेंपेस्ट

(D) मर्चंट ऑफ व्हेनिस, रोमिओ अँड जूलिएट आणि द टेंपेस्ट

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



10. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने पुढीलपैकी कोणता अनुवाद प्रकाशित केलेला **नाही** ?

(A) होमरचे 'ईलियड' हे महाकाव्य

(B) टॉलस्टॉयची 'वार अँड पीस' ही कादंबरी

(C) न्या. रानडे लिखित 'राइज ऑफ द मराठा पॉवर'

(D) स्टीफन हॉकिन्स यांचा 'हिस्टरी ऑफ टाइम' हा ग्रंथ

11. 'असंलक्ष्यक्रम ध्वनी' कोठे प्रत्ययास येतो ?

(A) वाद्यांच्या गजरामध्ये

(B) काव्यास्वादात

(C) कलास्वादात

(D) संगीताच्या मैफिलीत

12. सर्व गुणांचा समतोल समावेश असलेली, वामनाने प्रशंसिलेली रीती कोणती ?

(A) गौडी

(B) आरभटी

(C) वैदर्भी

(D) कौशिकी

13. ध्वनीचे दोन प्रकार कोणते ?

(A) सहजगम्य ध्वनी आणि गूढार्थध्वनी

(B) काव्यगत ध्वनी आणि व्यवहारांतर्गत ध्वनी

(C) तीव्र आणि सौम्य ध्वनी

(D) लौकिक आणि अलौकिक ध्वनी

14. अभिधाव्यापारासाठी आवश्यक असलेला 'संकेत' कशामुळे सिद्ध होतो ? असे वैय्याकरणी मानतात.

(A) जाती, गुण, द्रव्य आणि क्रिया या सर्वांमुळे

(B) फक्त जाती या एकाच घटकामुळे

(C) अपोहामुळे

(D) केवळ व्यक्तीमुळे

15. व्यंजना ही शब्दशक्ती कोठे कार्यरत होते असा मम्मटाचा आग्रह आहे :

(A) सर्व संभाषण व्यवहारात

(B) सर्व कलांच्या आविष्कारात

(C) फक्त काव्यात

(D) काही विशिष्ट कलांमध्ये

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



16. 'पुरुषार्थ' या शब्दातील 'पुरुष' या पदाचा अर्थ कोणत्या शब्दशक्तीमुळे निश्चित होतो ?

(A) लक्षणा

(B) अभिधा

(C) व्यंजना

(D) तात्पर्य

17. साहित्याच्या मूळतत्त्वांची चर्चा कोणत्या प्रकारच्या समीक्षेत आढळते ?

(A) विरचनावादी

(B) संरचनावादी

(C) उपयोजित

(D) सैद्धान्तिक

18. ललित साहित्याच्या भाषेचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते आहे ?

(A) प्रासादिकता

(B) माधुर्य

(C) अनेकार्थसूचकता

(D) बोली

19. 'साहित्याची भाषा' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

(A) भालचंद्र नेमाडे

(B) रंगनाथ पठारे

(C) वसंत आबाजी डहाके

(D) गो. मा. पवार

20. समीक्षकाचे व्यवच्छेदक लक्षण कोणते आहे ?

(A) उत्स्फूर्तता

(B) विशिष्ट विचारसरणीशी बांधिलकी

(C) चिकित्सक दृष्टी

(D) अलिप्तता

21. 'हेतुशून्य हेतुपूर्णता' या संकल्पनेचा प्रणेता कोण आहे ?

(A) क्रोचे

(B) लाँजायनस

(C) कांट

(D) डेरिदा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



22. 'पासंग' हा समीक्षात्मक लेखसंग्रह पुढीलपैकी कोणी लिहिला आहे ?

(A) वा. ल. कुलकर्णी

(B) व. दि. कुलकर्णी

(C) कुसुमावती देशपांडे

(D) गो. म. कुलकर्णी

23. आ, ई, ऊ हे स्वर कोणत्या प्रकारचे आहेत ?

(A) ऱ्हस्व

(B) दीर्घ

(C) संयुक्त

(D) अर्धस्वर

24. व्याकरणात भाषेचा कशाप्रकारे अभ्यास केलेला असतो ?

(A) सामाजिक

(B) मानसशास्त्रीय

(C) शास्त्रीय

(D) मजेशीर

25. 'मुलगा क्रिकेट खेळतो' या वाक्यात कोणता प्रयोग आहे ?

(A) कर्तरी

(B) कर्मणी

(C) भावे

(D) संकीर्ण

26. पहाड, हापूस व दफ्तर हे शब्द कोणत्या प्रकारचे आहेत ?

(A) तत्सम

(B) परभाषीय

(C) तदभव

(D) देशी

27. पुढील शब्दांपैकी कोणता एक नामधातू **नाही** ?

(A) खर्चणे

(B) पंक्चरणे

(C) बांधणे

(D) बदलणे

28. वृत्तान्तलेखनात पुढीलपैकी कशास सर्वाधिक महत्त्व असते ?

(A) यथातथ्यता

(B) भावपूर्णता

(C) तार्किकता

(D) आत्मनिष्ठा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



29. वरिष्ठांना औपचारिक स्वरूपाचे पत्र लिहायचे असल्यास पुढीलपैकी कोणता मायना वापराल ?

(A) प्रिय

(B) सप्रेम नमस्कार

(C) साष्टांग नमस्कार

(D) आदरणीय महोदय

30. जाहिरातींच्या भाषेचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते आहे ?

(A) दुर्बोधता

(B) पृथगात्मता

(C) आवाहकता

(D) संपृक्तता

31. वागिंद्रियाव्दारे निर्माण झालेले व भाषेत वापरलेले ध्वनी म्हणजे काय ?

(A) पद

(B) रूपिका

(C) स्वन

(D) रूपिम

32. भाषाशुद्धीची चळवळ पुढीलपैकी कोणी राबविली ?

(A) आचार्य अत्रे

(B) माधवराव पटवर्धन

(C) का. र. मित्र

(D) पु. भा. भावे

33. भाषिक संज्ञापन प्रक्रियेतील पुढील घटकांचा योग्य क्रम लावा :

(1) संकेतीकरण

(2) आशय

(3) ध्वनिग्रहण

(4) ध्वनिनिर्मिती

(5) विसंकेतीकरण

(A) (2), (1), (4), (3), (5)

(B) (1), (2), (3), (4), (5)

(C) (2), (4), (1), (3), (5)

(D) (1), (3), (5), (4), (2)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



34. भाषिक संज्ञापनातील पुढीलपैकी कोणते घटक कमी महत्त्वाचे आहेत ?
(A) मानवी मुखातील अवयव
(B) स्वनरचनांची निर्मिती
(C) स्वनांचा हवेतून होणारा संचार
(D) परिसरातील गोंगाट

35. पुढीलपैकी कोणती मराठीची बोली **नाही** ?
(A) अहिराणी
(B) वऱ्हाडी
(C) माळवी
(D) हळबी

36. 'कडबू' हा शब्द मराठीने पुढीलपैकी कोणत्या भाषेतून स्वीकारला आहे ?
(A) कन्नड
(B) बंगाली
(C) तेलगू
(D) गुजराती

37. 'मानवी वागिंद्रियाद्वारे स्वनांची निर्मिती कशी होते' याचा विचार पुढीलपैकी कोणत्या अभ्यासशाखेत होतो ?
(A) श्रव्य स्वनविज्ञान
(B) औच्चरिक स्वनविज्ञान
(C) व्याकरण
(D) सांचारिक स्वनविज्ञान

38. मराठी बोलीचा पद्धतशीर अभ्यास करण्याचा पहिला मान कोणाकडे जातो ?
(A) ग्रीम
(B) ग्रिअर्सन
(C) चॉम्स्की
(D) हॉकेट

39. 'स्वनिम', 'स्वनिकांतर', 'रुपिम', यासारखे पारिभाषिक शब्द फक्त प्रमाणभाषेत वापरले जातात; बोली भाषेच्या संदर्भात वापरले जात नाही. हे विधान ............... .
(A) बरोबर आहे
(B) चुकीचे आहे
(C) पूर्वार्ध बरोबर आहे
(D) उत्तरार्ध बरोबर आहे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



40. भाषांचा कालौघातील अवस्थांचा अभ्यास पुढीलपैकी कोणत्या शाखेत केला जातो ?

(A) वर्णनात्मक भाषाविज्ञान पद्धती

(B) ऐतिहासिक भाषाविज्ञान पद्धती

(C) समकालिक भाषाविज्ञान पद्धती

(D) तौलनिक भाषाविज्ञान पद्धती

41. भाषिक वर्तन ही संकल्पना कोणी मांडली ?

(A) स्किनर

(B) चॉम्स्की

(C) ग्रिअर्सन

(D) सोस्यूर

42. मराठी, गुजराती, हिंदी या भाषा कोणत्या भाषाकुळात येतात ?

(A) सिनो-तिबेटियन

(B) ऑस्ट्रो-आशियायी

(C) द्राविडी

(D) इंडो-युरोपियन

43. ' ॥ वाछि तो विजेया होईवा- ॥' असा उल्लेख :

(A) दिवे आगरातील शके 982 मधील ताम्रपटावर आढळतो

(B) दक्षिण सोलापूरातील कुडल येथे शके 940 मधील संगमेश्वर मंदिरातील सभामण्डपाच्या तुळईवर कोरलेला आहे

(C) अक्षी येथील शके 934 मधील संस्कृत मिश्रित मराठीच्या पहिल्या शिलालेखात आढळतो

(D) पंढरपूर येथील शके 1195 मधील मराठीच्या पहिल्या शिलालेखात आढळतो

44. महानुभाव संप्रदायाचा उदय महाराष्ट्रात झाला पण त्याचा प्रसार आणि प्रचार काबूल-कंदाहरापर्यंत झालेला होता :

(A) पूर्वार्ध बरोबर

(B) उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

45. 'स्यानपोथी' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) बाईदेव बास

(B) महदंबा

(C) म्हाहंभट

(D) मुक्ताबाई

46. 'जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमच्या चित्ता' हा आक्रोश कोणाचा ?

(A) सेना न्हावी

(B) चोखामेळा

(C) गोरा कुंभार

(D) कर्ममेळा

47. 'पोटासाठी जरी करी हरिकथा। जन रंजविता फिरतसे॥ तेणे घात केला एकोत्तरशतकुळांचा। पाहुणा यमाचा श्रेष्ठ थोर॥' ही रचना पुढीलपैकी कोणत्या संताची आहे ?

(A) संत तुकाराम

(B) संत नामदेव

(C) संत चोखामेळा

(D) संत कर्ममेळा

48. मराठी आख्यानकाव्याचे उद्गाते असे कोणास संबोधले जाते ?

(A) संत नामदेव

(B) महदंबा

(C) संत एकनाथ

(D) वरीलपैकी कोणतेही नाही

49. 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) वि. का. राजवाडे

(B) व. दि. कुलकर्णी

(C) वि. ल. भावे

(D) श्रीधर व्यंकटेश केतकर

50. भाऊसाहेब, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहंदळे, जनकोजी शिंदे, समसेरबहादूर, इब्राहिमखान, विश्वासराव या सर्वांचा निर्देश असणारा पानपतावरील अतिशय विश्वसनीय पोवाडा कोणत्या शाहिराचा आहे ?

(A) अनंत फंदी

(B) रामा सटवा

(C) प्रभाकर

(D) सगनभाऊ

www.prepp.in



ROUGH WORK